Only MS-CIT AUTHORISED CENTER IN TALEGAON
Career & Job Oriented Courses
BITS COMPUTER EDUCATION
MS-CIT
TALLY PRIME WITH GST
TYPING (English/Marathi)
DIPLOMA COURSES
ADVANCED EXCEL
Artificial Intelligence
Cybersecurity
C C++ JAVA PAYTHON
FREE CAREER TEST
9975855069 9970185069
SOFT SKILLS
1st floor, Near Maruti Mandir Chowk, Jain School road, Near Bombay Workshop, Talegaon Dabhade

साप्ताहिक
# अंबर
www.weeklyamber.com
मूल्य ३ रु. । पृष्ठे १२

Govt. Recognized Computer Training Center
LOTUS COMPUTERS
संगणक प्रशिक्षण केंद्र
Learn Outstanding, Tremendous Useful & Special
MS-CIT | Tally | ADVANCE EXCEL | DTP
Pro. Sandeep Ashokrao Magar (M.C.M., M. Com., G.D.C.&A.)
9850128691 | 9764596566
Head Office : Talegaon (Stn.) | Branch : Indori, Sudumbare

# प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स स्टडीजची सायबर जनजागृती



लोणावळा, दि. २६ : चिंचवड येथील इएसआयसी रुग्णालयामध्ये सायबर जनजागृती मोहीमेचे आयोजन करण्यात आले. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांमुळे सायबर सुरक्षिततेविषयी जनजागृती करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून प्रतीभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज् यांनी क्विक हील फाउंडेशन सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षाच्या संयुक्त विद्यमाने सायबर जनजागृती अभियान आयोजित केले जात आहे. यामध्ये प्रतिभा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी रुग्णालयामध्ये जात जनजागृती मोहीम राबवली.

या मोहिमेअंतर्गत रुग्णालयातील डॉक्टर्स, नर्स व कर्मचारी यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. वाढत्या डिजिटल वापरासोबतच ऑनलाइन फसवणुकीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने, प्रत्येकाने सजग राहून सुरक्षित इंटरनेटचा वापर करणे आवश्यक आहे, असा संदेश मोहिमेतून देण्यात आला.

कार्यक्रमात सायबर सुरक्षा तज्ज्ञांनी पासवर्ड व्यवस्थापन, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फिशिंग व व्हॉट्सअॅप फसवणूक टाळण्याचे उपाय, सरकारी व बँक संबंधित फसवणूक ओळखण्याचे मार्ग अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच प्रत्यक्ष उदाहरणे आणि व्हिडिओच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना जागरूक केले. या मोहिमे अंतर्गत अनुष्का अंबेकर, राजीव यांनी माहिती दिली.

प्रकल्प समन्वयक हर्षिता वच्चानि, अध्यक्ष श्रावणी सावंत, सचिव आकाश ठाकूर, अँक्टिव्हिटी डायरेक्टर ऑलिव वर्गीस व मीडिया डायरेक्ट मानसी वाडेकर होते. क्विक हिल सीएसआर एक्झिक्युटिव्ह अजय शिर्के, गायत्री केसकर व दिपू सिंह यांचा मार्गदर्शनाअंतर्गत कार्यरत आहे. या उपक्रमामुळे रुग्णालया मधील सदस्यांमध्ये डिजिटल सुरक्षा जाणिवा अधिक दृढ झाल्या असून, ही मोहीम अत्यंत यशस्वी ठरली.

सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांमुळे आजच्या घडीला सायबर सुरक्षिततेविषयी जनजागृती करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून प्रतीभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज यांनी क्विक हील फाउंडेशन सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा च्या संयुक्त विद्यमाने सायबर जनजागृती अभियान आयोजित केले जात आहे यामध्ये प्रतिभा कॉलेज च्या विद्यार्थ्यांनी रुग्णालयामध्ये जनजागृती मोहीम राबवली.

या मोहिमेअंतर्गत रुग्णालयातील डॉक्टर, नर्स व कर्मचारी यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. वाढत्या डिजिटल वापरासोबतच ऑनलाइन फसवणुकीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने, प्रत्येकाने सजग राहून सुरक्षित इंटरनेटचा वापर करणे आवश्यक आहे, असा संदेश मोहिमेतून देण्यात आला.

कार्यक्रमात सायबर सुरक्षा तज्ज्ञांनी पासवर्ड व्यवस्थापन, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फिशिंग व व्हॉट्सअॅप फसवणूक टाळण्याचे उपाय, सरकारी व बँक संबंधित फसवणूक ओळखण्याचे मार्ग अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच, प्रत्यक्ष उदाहरणे आणि व्हिडिओच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना जागरूक केले. या मोहिमेअंतर्गत अनुष्का अंबेकर, राजीव यांनी माहिती दिली.